नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३४९ Issue - 349 | वार मंगळवार दि. १२ मे २०२६ Blow- Tuesday Date 12 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# 'शेती आपली आई, तिला रसायनांपासून वाचवा'

## परकीय चलनाचा ओघ रोखण्यासाठी छोटे संकल्प; जागतिक युद्धाच्या सावटात पंतप्रधानांचे शेतकऱ्यांना आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या २४ तासांत दुसऱ्यांदा राष्ट्राला उद्देशून महत्त्वाचे आवाहन केले आहे. पश्चिम आशियातील वाढता तणाव आणि जागतिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर, भारताची अर्थव्यवस्था सावरण्यासाठी प्रत्येक नागरिकाने योगदान देणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. विशेषतः शेती, इंधन आणि खा-द्यतेल या क्षेत्रांत 'बचत आणि बदल' करण्याचा मंत्र त्यांनी दिला आहे.

नैसर्गिक शेतीकडे वळण्याची गरज: रासायनिक खतांपासून मुक्ती

शेती ही आपली माता आहे आणि तिला रासायनिक खतांच्या विळख्यातून बाहेर काढणे ही आपली जबाबदारी आहे, अशा भावनिक शब्दांत पंतप्रधानांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. आपण सर्व शेतीपुत्र आहोत, त्यामुळे जमिनीचा कस टिकवण्यासाठी आता रासायनिक शेतीला पूर्णविराम देऊन नैसर्गिक शेतीचा (छर्ीींीरश्र ऋरीाळपस) मार्ग स्वीकारणे काळाची गरज असल्याचे



त्यांनी सांगितले. यामुळे केवळ जमिनीचे आरोग्य सुधारणार नाही, तर शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही कमी होईल. पंतप्रधानांनी सध्याच्या जागतिक परिस्थितीवर चिंता व्यक्त केली. कोरोना महामारी आणि त्यानंतरच्या आर्थिक संकटातून जग सा-वरत असतानाच, आता पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीने नवीन संकट उभे केले आहे. या युद्धाचा थेट परिणाम जागतिक पुरवठा साखळीवर (डीीिश्रि उहरळप) होत असून भारतालाही त्याचे चटके सोसावे लागत आहेत. हे या दशकातील मोठे संकट आहे, पण आपण एकत्रितपणे यातून नक्कीच मार्ग काढू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

परकीय चलनाचा ओघ रोखण्यासाठी छोटे संकल्प

भारत कच्च्या तेलासाठी आणि खाद्यतेलासाठी मोठ्या प्रमाणात परकीय चलन (ऋेीशळसप एु-लहरपसश) खर्च करतो. जागतिक संकटामुळे या वस्तूंच्या किमती गग-नाला भिडल्या आहेत. हा आर्थिक बोजा कमी करण्यासाठी पंतप्रधानांनी नागरिकांना 'छोटे संकल्प' करण्याचे आवाहन केले आहे. जोपर्यंत



परिस्थिती सामान्य होत नाही, तोपर्यंत आपल्याला उपभोग कमी करून कर्तव्याला प्राधान्य द्यावे लागेल, असे मोदी म्हणाले. इंधन आणि खाद्यतेल बचतीसाठी 'लाईफस्टाईल'मध्ये बदल - पंतप्रधानांनी दैनंदिन जीवनात खा-लील बदल सुचवले आहेत. जिथे शक्य आहे तिथे खासगी वाहनांऐवजी मेट्रो, इलेक्ट्रिक बस आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा. कंपन्यांनी 'वर्क फ्रॉम होम'ला प्राधान्य द्यावे, शाळांनी ऑनलाईन क्लासेस घ्यावेत आणि बैठका शक्यतो ऑनलाईन स्वरूपात कराव्यात, जेणेकरून इंधनाची बचत होईल. खाद्यतेलाच्या आयातीवर मोठा खर्च होतो, त्यामुळे त्याचा वापर मर्यादित केल्यास देशाच्या तिजोरीवरील ताण कमी होईल आणि आरोग्यालाही फायदा होईल.

# राज्यात उन्हाचा चटका कायम, तापमानाचा पारा ४५ अंशावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दिवसेंदिवस राज्यात उन्हाचा चटका वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या उन्हाचा लोकांना मोठा त्रास होत आहे. राज्याच्या अनेक भागात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे. तर काही भागात ३५ ते ४० अंशाच्या दरम्यान तापमानाचा पारा आहे. दरम्यान मुंबईत देखील तापमानात वाढ होत असल्याचं दिसत आहे. मुंबईतील तापमान चाळीशी नजीक पोहोचले आहे. मुंबईतील तापमानात मागील काही दिवसांत वाढ झाली आहे. जाणून घेऊयात राज्यात कोणत्या शहरात किती तापमान आहे याबाबतची माहिती.

मुंबईतील राम मंदिर परिसरात तापमान ३९.७अंश सेल्सिअस तापमान नोंदवले आहे. सोबतच, विक्रोळीतही तापमानाचा पारा ३८.५ अंश सेल्सिअस झाला आहे. तर वांद्रे परिसरात तापमान ३७.३ अंश सेल्सिअस नोंद करण्यात आले आहे. तर मुंबईतील सांताक्रुज परिसरात ३५.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.

राज्यातील काही महत्त्वाच्या शहरांमधील



तापमान

छत्रपती संभाजीनगर - ४३.४ मालेगांव - ४३.२ सतारा - ४१.१ जळगाव - ४४.३ रत्नागिरी - ३४ नाशिक - ४२ नवी मुंबई - ३९.२ बारामती - ४१.२ कुलाबा - ३५.४ पुणे - ४१.६ अलीबाग - ३८.२ बीड - ४३.५ नंदुरबार - ४५.३ सोलापूर - ४२.३ परभणी - ४३.२ मुंबई - ३५.८ माथेरान - ३६.६ अहिल्यानगर - ४२.२ अकोला - ४५.१ अमरावती - ४४ भंडारा - ४२ बुलढाणा - ४३.२ ब्रह्मपुरी - ४२.२ चंद्रपुर - ४१ नागपुर - ४२ वर्धा - ४३.८ वाशिम - ४२.६ यवतमाळ- ४१.४

ग्रामीण भागात पाणी टंचाईच्या झळा

उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून ग्रामीण भागात पाणी टंचाईच्या झळा आता अधिक तीव्र होऊ लागल्या आ-हेत. परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात सध्या पाणीटंचाईची गंभीर परिस्थिती निमर्ण झाली असून प्रशासनाकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. जिंतूर तालुक्यातील कौसडी, वाघी धान-ोरा आणि शेवडी या गावांमध्ये सध्या पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे.

त्यामुळे प्रशासनाने या गावांसाठी एकूण ५ टँकरने पाणी सुरू केले आहे. त्यामध्ये कौसडी गावासाठी ३ टँकर्स तर शेवडी आणि वाघी धानोरा गावासाठी प्रत्येकी १ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. उन्हाळा जसजसा पुढे सरकत आहे, तसतशी पाण्याची पातळी खालावत असून अनेक विहिरी आणि बोअरवेल कोरड्या पडू लागल्या आहेत. त्यामुळं ग्रामीण भागातील नागरिकांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. प्रशासनाने तात्पुरत्या स्वरूपात टँकर सुरु केले असले तरी आगामी काळात पाणीटंचाई अधिक वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सार्वजनिक - खासगी भागीदारी तत्त्वावर एसटी उभारणार २०० चार्जिंग स्टेशन : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एसटी महामंडळातील सर्व बसेस २०३५ पर्यंत ई-बसेसमध्ये रूपांतरित करण्याच्या दृष्टीने राज्य शासन आणि एसटी महामंडळाकडून वेगाने प्रयत्न सुरू आहेत. या अनुषंगाने आवश्यक असलेल्या चार्जिंग सुविधांची उभारणी करण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वा-वर राज्यभरात किमान २०० चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार असून, यासाठी लवकरच निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.



मंत्रालयीन दालनात आयोजित बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार गिरीश देशमुख तसेच सर्व विभागप्रमुख उप-स्थित होते. मंत्री सरनाईक म्हणाले की, २०३५ पर्यंत एसटीच्या सर्व बसेस ई-बसेस करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्या दृष्टीने भविष्यात सुमारे २० हजार ई-बसेससाठी आवश्यक चार्जिंग स्टेशन उभारणे ही काळाची गरज आहे. राज्यभरातील एसटी महामंडळाच्या उपलब्ध जागांवर नियोजित चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी ठराविक क्षेत्र संबंधित विकासकाला देण्यात येईल. त्या ठिकाणी विकासकाकडून आधुनिक चार्जिंग स्टेशन उभारण्यात येतील, जिथे एसटीच्या ई-बसेस चार्ज केल्या जातील. यासोबतच सुमारे १५०० चौरस फूट जागा संबंधित विकासकाला भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्यात येणार असून, इतर वेळेत त्या चार्जिंग स्टेशनवर खासगी वाहनांनाही चार्जिंग सुविधा देण्यास परवानगी असेल. त्यामुळे एसटी महामंडळाला माफक दरात ई-बसेस चार्जिंगची सुविधा उपलब्ध होईल. तसेच विकासकाने वापरलेल्या जा-गेचे भाडे आणि खाजगी वाहनांच्या चार्जिंगमधून मिळणाऱ्या नफ्यातील ठराविक हिस्सा महसूल स्वरूपात एसटी महामंडळाला प्राप्त होणार आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारीतील प्रकल्पाची निविदा प्रक्रिया येत्या काही दिवसांत सुरू करण्यात येईल. त्यामुळे भविष्यात पर्यावरणपूरक ई-बसेसच्या दृष्टीने एसटी महामंडळ स्वयंपूर्ण होईल, असा विश्वासही मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

**खरीप हंगाम २०२६ : कृषी विभागाने तसेच लोकप्रतिनिधी यांनी शेतकऱ्यांनी माती परीक्षण करून घेण्यासाठी त्यांचे प्रबोधन करावे**

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात खते व बियाणे उपलब्ध करावीत : पालकमंत्री जयकुमार गोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : जिल्ह्यात खरीप हंगाम २०२६ साठी कृषी विभागाने ४ लाख ९९ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे नियोजन केलेले आहे. मागील वर्षीपेक्षा यावर्षीच्या खरीप हंगामात पेरणी क्षेत्रात वाढ दिसत आहे. तरी कृषी व संबंधित विभागांनी जिल्ह्या-तील सर्व शेतकऱ्यांना यावर्षीच्या खरीप हंगामासाठी खते व बियाणे मुबलक प्रमाणात व वेळेवर उपलब्ध करावेत, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

नियोजन भवन येथे आयोजित खरीप हंगाम २०२६ आढावा बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, राज्यसभा खासदार ज्योती वाघमारे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, विभागीय कृषी सह संचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांच्या सह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे पुढे म्हणाले की, खते पुरवठा करणाऱ्या कंपन्या तसेच बियाणे पुरवठा करणाऱ्या कंपन्यांकडून कृषी विभागाने वेळेतच खते व बियाणे उपलब्ध करून घ्यावेत तसेच विक्रेत्यामार्फत विनालिंकिंग शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावेत. जे निविष्ठा विक्रेते लिंकिंग करून शेतकऱ्यांना बोगस खते व बियाणे विकत असतील अशा विरोधात प्रशासनाने कठोर कारवाई करावी. यामध्ये लोकप्रतिनिधी तसेच अधिकाऱ्यांनी अत्यंत संवेदनशील होऊन काम करावे व लिंकिंग होऊ देऊ नये. पोलीस विभागाने यासंबंधी तक्रारी प्राप्त झाल्यावर त्यावर तात्काळ गुन्हे दाखल करून घ्यावेत, असेही त्यांनी निर्देशित केले.




मागील वर्षी अतिवृष्टी व गारपिटीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मिळालेले अनुदान तात्काळ वाटप झाले पाहिजे. शेतकऱ्यांची एकदा इ केवायसी झाल्यानंतर पुन्हा पुन्हा ई केवायसी करू नये व संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान वितरित करावे. ही केवायसी अनुषंगाने मंत्रिमंडळाने पुनर्वसन सचिवांना याबाबत सविस्तर सूचना दिलेल्या आहेत त्या अनुषंगाने प्रशास-नाने अनुदान वितरण करणे अनिवार्य असल्याचे पालकमंत्री श्री. गोरे यांनी सुचित केले.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेत जमिनीचे माती परीक्षण करून घेण्याबाबत लोकप्रतिनिधी तसेच कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रबोधन करावे. तसेच जिल्ह्याला एकच माती परीक्षण लॅब आहे. तरी यापुढील काळात प्रत्येक तालुक्याला माती परीक्षण लॅब असावी याबाबत प्रयत्न करणार असल्याचे श्री गोरे यांनी सांगून कृषी विभागाने फळबाग लागवडीत चांगले काम करावे यासाठी मागील वर्षीपेक्षा यावर्षी फळबाग लागवडीचे उद्दिष्ट दुप्पट करावे व प्रत्येक तालुका कृषी अधिकाऱ्यांना उद्दिष्ट ठरवून देण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

क्यूआर कोड चे विमोचन -

कृषी निविष्ठांच्या अनुषंगाने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सहज व सुलभ पद्धतीने तक्रार नोंदविता येईल यसाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या संकल्पनेतून क्यूआर कोड तयार करण्यात आलेला आहे. हा क्यूआर कोड प्रत्येक ग्रामपंचायत कृषी सहाय्यक कार्यालयात उपलब्ध करून दिला जाणार आहे त्या अनुषंगाने संबंधित शेतकरी यावर तक्रार नोंदवतील व त्या तक्रारीची दखल घेऊन जास्तीत जास्त सात दिवसात त्याचे निवारण करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिली. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे व मान्यवरांच्या उपस्थितीत या तक्रार निवारण क्यूआर कोड चे विमोचन करण्यात आले.

प्रारंभी जिल्हा अध्यक्ष कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी खरीप हंगाम २०२६ साठी कृषी विभागाने केलेल्या तयारीची सविस्तर माहिती दिली.

मागील वर्षी चार लाख १७ हजार हेक्टर क्षेत्र खरीप हंगामासाठी पेरणी झालेली होती तर यावर्षी चार लाख ९९ हजार हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी होणार असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी खते व बियाणे शेतकऱ्यांना वेळेत उपलब्ध होतील याचेही नियोजन झालेले असून बफर स्टॉक ही उपलब्ध आहे असे माहिती त्यांनी दिली. सोलापूर जिल्ह्याला दोन लाख ५१ हजार ९०० मेट्रिक टन इतका खत उपलब्ध असल्याचे सांगितले.

केळी लागवड, फळ लागवड, पीक परिस्थितीत होत असलेला बदल, पीक कर्ज वाटप, नमो शेतकरी योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा अनुदान, पीएम किसान सन्मान निधी, माती परीक्षण पत्रिका या विषयी श्री. भोसले यांनी सविस्तर माहिती बैठकीत दिली.

यावेळी आमदार सर्वश्री सुभाष देशमुख, बाळासाहेब देशमुख, समाधान आवताडे, अभिजित पाटील, उत्तम जानकर, नारायण पाटील यांनी ही कृषी विभागाने शेतकऱ्यांना खते व बियाणे वेळेत उपलब्ध करून द्यावेत. तसेच लिंकिंग होणार नाही याची काळजी घेण्याची मागणी केली.

प्रारंभी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते आंबा फळझाडाला पाणी घालून, सोयाबीन पिकाची प्रातिनिधिक स्वरूपात पेरणी करून तसेच दीप प्रज्वलन करून खरीप हंगाम बैठकीला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर कृषी क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच उत्कृष्ट उत्पादन घेतलेल्या शेतकऱ्यांना पालकमंत्री यांच्या हस्ते गौरवण्यात आले. तर कृषी विभागात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांचाही सन्मान पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला.

**दुष्काळाची परिस्थिती लक्षात घेऊन कृषी विभागाने अल निनो सुरक्षा कवच पंचसूत्री राबवावी. यामध्ये पीक नियोजन, पाणी व्यवस्थापन, कीड रोग व्यवस्थापन, पावसाचा खंड व्यवस्थापन, जोखीम व्यवस्थापन आदीबाबत सर्व शेतकऱ्यांना व नागरिकांना जागृत करावे, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले. वीज वितरण कंपनीने त्यांच्याकडे प्रलंबित असलेले डीपी दोन दिवसात दुरुस्त करून शेतकऱ्यांना सुरळीतपणे वीज पुरवठा करावा. सर्व बँकांनी शेतकऱ्यांना त्वरित पीककर्ज केला पाहिजे, असे ही सूचना त्यांनी दिल्या.**

दैनिक
यश सिद्धि न्यूज
मंगळवार दि. १२ मे २०२६


## संपादकीय....

### तापमानाचा फटका

राज्यातील तापमानाचे आकडे धडकी भरवणारे आहेत. अनेक जिल्ह्यांमध्येही पारा ४२ अंशांच्या पुढे गेला आहे. विचित्र बाब म्हणजे, कडाक्याच्या उन्हा सोबतच काही जिल्ह्यांत पावसानेही हजेरी लावली आहे, ज्यामुळे हवेत आर्द्रता वाढून अंगाची लाहीलाही होत आहे. आज प्रामुख्याने जळगाव, नंदूरबार, नाशिक, धुळे, जालना आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा कायम असून नागरिकांनी सावध राहणे गरजेचे आहे. वाढत्या तापमानाचा थेट परिणाम आता पाणीसाठ्यावर होऊ लागला आहे. तीव्र उन्हामुळे पाण्याच्या बाष्पीभवनाचा वेगही गेल्या वर्षाच्या तुलनेत १५ टक्क्यांनी वाढला असल्याने, आगामी काळात पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राजधानी मुंबईसह ठाणे आणि कोकण पट्ट्यातही उन्हाचा त्रास वाढला आहे. मुंबईत तापमान ३५ अंश असले तरी समुद्राजवळील दमट हवेमुळे प्रत्यक्षात जास्त उकाडा जाणवत आहे. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत उष्ण आणि दमट हवामानाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. वाढत्या उष्णतेमुळे होणारा संभाव्य 'हिटस्ट्रोक' (उष्णघात) रोखण्यासाठी प्रशासनाने ठिकठिकाणी उष्णघात कक्ष कार्यान्वित केले आहेत. जास्तीत जास्त पाणी पिणे, सुती कपडे वापरणे आणि आरोग्याची काळजी घेण्याच्या सूचना आरोग्य विभागाकडून देण्यात आल्या आहेत. दरम्यान, यंदा मान्सून लवकर येण्याचे संकेत असले तरी, सध्या सुरू असलेल्या उन्हाचा चटका सुसह्य होण्यासाठी पावसाची प्रतीक्षा कायम आहे. सध्या संपूर्ण राज्यात निसर्गाचे दोन टोकाचे रूप पाहायला मिळत आहे. एकीकडे काही भागांत पावसाची हजेरी असतानाच, दुसरीकडे मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात कडाक्याचे ऊन पडत आहे. भारतीय हवामान विभागाने या भागांसाठी 'येलो अलर्ट' जारी केला आहे. विशेषतः दुपारी १२ ते ४ या वेळेत सूर्याची तीव्रता सर्वाधिक असल्याने, अतिशय महत्त्वाच्या कामाशिवाय घराबाहेर पडू नका, असे कडक आवाहन प्रशासनाने नागरिकांना केले आहे. उन्हाच्या झळा इतक्या तीव्र आहेत की, आरोग्याची विशेष काळजी घेणे आता अनिवार्य झाले आहे.

# जागतिक परिचारिका दिन : मायेच्या स्पर्शामागची अदृश्य ताकद

## रुग्णाच्या वेदनेसमोर उभा राहणारा मायेचा हात आणि आरोग्य व्यवस्थेचा खरा कणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रुग्णालयाच्या दारातून आत पाऊल टाकताच माणूस सर्वप्रथम ज्या भावनेला सामोरा जातो, ती म्हणजे असुरक्षितता. आजारपण माणसाला केवळ शारीरिकदृष्ट्या कमकुवत करत नाही तर त्याच्या मनात भीती, अस्वस्थता आणि अनिश्चिततेचे ढगही दाटवते. रुग्णालयात डॉक्टर उपचार सुरू करतात पण रुग्णाच्या मनातला पहिला धीर अनेकदा परिचारिकेच्या स्पर्शातूनच जन्म घेतो. म्हणूनच रुग्णसेवेच्या जगात परिचारिका ही केवळ आरोग्य व्यवस्थेतील एक कर्मचारी नसते; ती उपचार आणि मानवता यांच्यातला सर्वांत जिवंत दुवा असते. दरवर्षी १२ मे हा दिवस जागतिक परिचारिका दिन म्हणून पाळला जातो. आधुनिक परिचर्या सेवेची जननी मानल्या जाणाऱ्या ऋश्रेीशपलश छळसहींळपसरश्रश यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस साजरा होतो. पण हा दिवस केवळ औपचारिक अभिनंदनाचा नसावा तर तो समाजाच्या आत्मपरीक्षणाचाही दिवस असायला हवा. कारण आरोग्य व्यवस्थेच्या भक्कम इमारतीचा पाया जर कोणी असेल, तर तो परिचारिकांच्या निःशब्द, सातत्यपूर्ण आणि समर्पित सेवेत आहे.

परिचारिका म्हणजे फक्त इंजेक्शन देणारी किंवा औषधे वेळेवर देणारी व्यक्ती, अशी अनेकांची अजूनही मर्यादित समजूत आहे. प्रत्यक्षात परिचारिका रुग्णाच्या वेदनेचे सूक्ष्म निरीक्षण करते, त्याच्या प्रकृतीतील बदल सर्वप्रथम ओळखते, नातेवाईकांच्या प्रश्नांना संयमाने उत्तर देते, डॉक्टरांच्या सूचनांचे काटेकोर पालन करते आणि गरज पडल्यास मानसिक आधारही देते. तिची भूमिका केवळ वैद्यकीय प्रक्रियेत मर्यादित नसते तर ती मानवी वेदनेशी थेट संवाद साधणारी असते. रुग्णालयात रात्रीचे अंधारलेले तास असोत किंवा पहाटेची वेळ रुग्णाच्या पलंगाजवळ जागी असणारी व्यक्ती अनेकदा परिचारिकाच असते. डॉक्टरांचे राऊंड ठराविक वेळी असतात; पण परिचारिकेची ड्युटी वेळेशी बांधलेली नसते. तिच्या जबाबदारीला घड्याळाचे काटे नसतात. कधी अतिदक्षता विभागात जीवन-मरणाच्या सीमारेषेवर झुंजणाऱ्या रुग्णाची काळजी, तर कधी प्रसूती कक्षात नवजीवनाच्या स्वागताची धावपळ, प्रत्येक ठिकाणी परिचारिकेची उपस्थिती अपरिहार्य असते.

कोरोना काळाने जगाला दाखवून दिले की आरोग्यसेवेचा सर्वांत सातत्याने धावणारा श्वास म्हणजे परिचारिका. संसर्गाची भीती, अपुऱ्या साधनसामग्रीची चिंता, स्वतःच्या कुटुंबापासून दूर राहण्याची वेदना आणि मृत्यूचे रोज समोर दिसणारे भय, या सगळ्यांच्या छायेत हजारो परिचारिका न डगमगता उभ्या राहिल्या. अनेकांनी स्वतःचे आरोग्य धोक्यात घातले, काहींनी प्राणही गमावले. त्या काळात समाजाने त्यांना टाळ्या वाजवून सलाम केला; पण प्रश्न असा आहे की, संकट ओसरल्यानंतर त्या समर्पणाची आपण कितपत दखल घेतली? आजही अनेक परिचारिका प्रचंड कामाच्या ताणाखाली काम करतात. अनेक रुग्णालयांत कर्मचारी अपुरे असतात, त्यामुळे एका परिचारिकेवर असंख्य रुग्णांची जबाबदारी येते. सलग ड्युटी, रात्रपाळी, भावनिक ताण, संसर्गाचा धोका आणि अनेकदा कमी वेतन, या सगळ्यांमध्ये त्यांची सेवा सुरू असते. समाजाला परिचारिकेकडून करुणा, संयम, तत्परता आणि हसू अपेक्षित असते पण तिच्या थकव्याची, मानसिक ताणाची आणि वैयक्तिक आयुष्याच्या किंमतीची दखल किती जण घेतात?






– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

परिचारिकांविषयी समाजात असलेली काही रूढ प्रतिमाही बदलण्याची गरज आहे. परिचर्या ही केवळ स्त्रियांची सेवा नव्हे तर ती उच्च दर्जाचे प्रशिक्षण, निर्णयक्षमता, निरीक्षणशक्ती आणि वैद्यकीय कौशल्य यांची मागणी करणारे व्यावसायिक क्षेत्र आहे. एखाद्या रुग्णाच्या प्रकृतीत सूक्ष्म बदल आेळखून तातडीने योग्य सूचना देण्याची क्षमता अनेकदा जीव वाचवते. म्हणून परिचारिकेला केवळ 'सहाय्यक' म्हणून पाहणे हे तिच्या भूमिकेचे अवमूल्यन आहे. आरोग्य व्यवस्थेच्या संदर्भात आणखी एक वास्तव विचारात घ्यावे लागेल. मोठमोठी खासगी रुग्णालये, आधुनिक उपकरणे, अत्याधुनिक यंत्रणा आणि चमकदार आरोग्यसेवा यांचा आपण गौरव करतो, पण त्या यंत्रणेच्या केंद्रस्थानी असलेल्या परिचारिकांच्या कामाच्या अटी अनेकदा समाधानकारक नसतात. अनेक ठिकाणी वेतनविषयक असमानता, बढतीची मर्यादित संधी, करार पद्धतीची असुरक्षितता आणि पुरेशा विश्रांतीचा अभाव ही गंभीर वास्तव आहेत.

ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपजिल्हा रुग्णालये, माता-बाल आरोग्य सेवा, लसीकरण मोहिमा आणि जनजागृती अभियानांमध्ये परिचारिकांचे योगदान तर अधिकच महत्त्वाचे आहे. शहरात सुविधा असतात; गावात अनेकदा साधनसामग्रीही अपुरी असते. अशा परिस्थितीतही दुर्गम भागात सेवा देणाऱ्या परिचारिका केवळ नोकरी करत नाहीत; त्या समाजाच्या आरोग्याची जीवनरेषा सांभाळत असतात. महिलांचे प्रमाण या क्षेत्रात अधिक असल्याने परिचारिकांच्या प्रश्नांकडे लिंग-संवेदनशीलतेने पाहण्याचीही गरज आहे. कामाच्या ठिकाणी सुरक्षितता, सन्मान, छळापासून संरक्षण, मातृत्वाच्या गरजांची दखल आणि काम-जीवन संतुलन या प्रश्नांवर अजूनही पुरेसे लक्ष दिले जात नाही. करुणा देणाऱ्यांच्या आयुष्यातही करुणेची गरज असते, हे समाजाने विसरू नये.

जागतिक परिचारिका दिन हा केवळ कृतज्ञतेचा दिवस नाही तर तो धोरणात्मक बांधिलकीचा दिवस आहे. आरोग्य व्यवस्थेत पुरेशी मनुष्यबळ भरती, गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण, मानसिक आरोग्य सहाय्य, सुरक्षित कामकाज, योग्य वेतन आणि व्यावसायिक सन्मान यांची हमी देणे ही काळाची गरज आहे. परिचारिकांवर फुलांचा वर्षाव करून गौरव करणे सोपे आहे पण त्यांना न्याय्य व्यवस्था देणे हेच खरे सामाजिक उत्तरदायित्व आहे. या निमित्ताने समाजाने स्वतःलाही काही प्रश्न विचारले पाहिजेत. रुग्णालयात परिचारिकेशी आपण आदराने बोलतो का? तिच्या कामाच्या ताणाची जाणीव ठेवतो का? तिच्या सूचनांचे गांभीर्य समजून घेतो का? सेवा अपेक्षित असते; पण सेवकाचा सन्मान करणे हीही सभ्यतेची कसोटी आहे.

परिचारिका म्हणजे केवळ वैद्यकीय यंत्रणेतील एक घटक नाही. ती वेदनेसमोर धीर देणारा आवाज आहे. ती भीतीसमोर आश्वासक उपस्थिती आहे. ती नवजात बाळाच्या पहिल्या श्वासाची साक्षीदार आहे आणि मृत्यूच्या उंबरठ्यावरच्या शेवटच्या क्षणातही शांततेचा हात धरून उभी असते. माणसाच्या आयुष्यातील सर्वांत असुरक्षित क्षणी जो हात आधार देतो, त्याचे महत्त्व शब्दांत मावणारे नाही. आजच्या स्पर्धात्मक, वेगवान आणि अनेकदा संवेदनाहीन होत चाललेल्या समाजात परिचारिकांचे अस्तित्व आपल्याला एक मूलभूत मूल्य आठवण करून देते, मानवता अजून जिवंत आहे. औषध उपचार करू शकते, तंत्रज्ञान निदान करू शकते पण मायेचा स्पर्शच अनेकदा जगण्याची उमेद परत आणतो. जागतिक परिचारिका दिनानिमित्त आपण हा संकल्प करू या, परिचारिकांचा सन्मान केवळ अभिनंदनात नसतो तर तो त्यांच्या कामाच्या अटी, सुरक्षितता आणि न्याय्य वेतनात दिसला पाहिजे. त्यांच्या सुरक्षिततेची हमी द्यायची. त्यांच्या व्यावसायिक सन्मानाला समाजाच्या केंद्रस्थानी ठेवायचे. कारण शेवटी आरोग्य व्यवस्थेची खरी ताकद केवळ यंत्रांमध्ये नसते; ती त्या निःशब्द, जागत्या डोळ्यांत असते, जे रात्रभर एखाद्या अनोळखी रुग्णासाठी जागत असतात. त्यांच्या मायेचा स्पर्श, त्यांच्या सेवाभावाची ऊब आणि त्यांच्या समर्पणाचा प्रकाश आपल्या समाजाला अधिक मानवी, अधिक संवेदनशील आणि अधिक सशक्त बनवत राहो, हीच कृतज्ञ शुभेच्छा! जागतिक परिचारिका दिनानिमित्त सर्व परिचारिकांना मनःपूर्वक अभिवादन!

# ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त उपजिल्हा रुग्णालय कळंब येथे फळाचे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्या जन्मदिनानिमित्त साजऱ्या होणाऱ्या 'स्वाभिमान दिना'चे औचित्य साधून उपजिल्हा रुग्णालय, कळंब येथे सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

प्रतिष्ठित व्यक्तिमत्व व सामाजिक कार्यकर्ते, अड बाळासाहेब आंबेडकर यांचे कट्टर समर्थक आयु. बाबासाहेब टोपे यांच्या हस्ते रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. यावेळी टोपे यांनी सर्व रुग्णांशी संवाद साधत त्यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली.

या कार्यक्रमाला वैद्यकीय अधीक्षक डॉ. लामतुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच रुग्णालयातील कर्मचारी, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते व वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब कांबळे, शितलकुमार गायकवाड, भैय्या टोपे, दिपक टोपे, बाळासाहेब वाघमारे,

अतुल टोपे, चिंटू समुद्रे, नंदकुमार सावंत, प्रतीक टोपे, प्रज्ञेश टोपे, दिनेश वाघमारे, किशोर धावारे यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जपत सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून हा उपक्रम पार पडला.

# टाकळीचे विशाल दूधभातेसह २४ विद्यार्थ्यांची कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्लेसमेंटमध्ये अमेरिकन कंपनीमध्ये निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाच्या कॉलेज ऑफ फार्मसी सोलापूर यांच्या वतीने आयोजित केलेल्या ड्राईव्ह मध्ये सोलापूर धाराशिव आणि सांगली जिल्ह्यातील विविध फार्मसी विद्यालयातील एकूण ११३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता यातील २४ विद्यार्थ्यांची अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली आहे या आधारे सोलापूर शहर जिल्ह्याच्या प्रगतीकडे पाऊल टाकत असल्याचे सांगण्यात आले.



यामध्ये डी.एस.टी.एस मंडळ कॉलेज ऑफ फार्मसी सोलापूर एस. पी. एम .कॉलेज ऑफ फार्मसी, अकलूज, श्री गणपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासिटिकल सायन्सेस टेंभुर्णी, गांधी नाथा आरंगाजी कॉलेज ऑफ फार्मसी सोलापूर सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी मेथोडे, फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी सांगोला लोकमंगल कॉलेज ऑफ फार्मसी वडाळा धाराशिव जिल्ह्यातील एसबीएम एन एम कॉलेज ऑफ फार्मसी आणि आर पी कॉलेज ऑफ फार्मसी धाराशिव आणि सांगलीचे आदर्श कॉलेज ऑफ फार्मसी विटा असे एकूण दहा फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या पूल कॅम्पस प्लेसमेंट ड्रायव्हर मध्ये सहभाग नोंदवला नायलॉन लॅबोरेटरीज लिमिटेड मंगळूर वेट इस कंपनी या अमेरिकन कंपनीकडून प्लेसमेंट जुळे सोलापूर येथील शिवदारी शिक्षण संकुलातील कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये आयोजित करण्यात आले होते निवड समितीला टेक्निकल प्रतिनिधी म्हणून रवी एन नवीन कुमार जे दिनेश कुमार यांनी तर एचआर प्रतिनिधी म्हणून नितीन जी के संतोष कुमार व कीर्ती कैतवास यांनी काम पाहिले व महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफ ऑफिसर प्राध्यापक डॉक्टर आबा अन्सारी यांनी प्लेसमेंट आयोजन केले प्लेसमेंट ड्राईव्ह मध्ये कॉलेज ऑफ फार्मसी सोलापूर मध्ये विशाल दूधभाते यांच्यासह आठ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे त्यांच्या संस्थेचे चेअरमन रास शेखर शिवदारे प्राध्यापक भीमाशंकर शेटे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले त्यानंतर टाकळीचे ग्रामस्थांनी विशाल दूधवाते यांची शिवशरण दोन बाते मित्रपरिवार तर्फे पेढे भरून मोठ्या थाटात सत्कार करण्यात आला. त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी शिवशरण दूधवाते श्रीकांत बगले दयानंद दूधभाते भीमाशंकर सुरवसे निलंगा कोळी मल्लिकार्जुन दूधभाते बिराप्पा माने, बिरोबा दूधभाते यल्लप्पा दुधभाते दत्ता कोळी विश्वजीत दूधभाते विक्रम दूधभाते खंडाप्पा दूधभाते चिदानंद बगले आणि ग्रामस्थ मान्यवर उपस्थित होते.

# रावगाव सब स्टेशन हे मी पाठपुरावा करून आणलेली काम असल्याने सब स्टेशनची लोकार्पण करत असताना प्रयत्न सफल झाल्याचे मानसिक समाधान वाटते : आ. नारायण पाटील



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : रावा सबस्टेशन हे मी पाठपुरा करून आणलेली एक काम असल्याने सब स्टेशनची लोकार्पण करत असताना प्रयत्न सफल झाले की मानसिक समाधान असल्याचे प्रतिपादन आमदार नारायण आबा पाटील यांनी व्यक्त केले रायगाव तालुका करमाळा येथील कार्यक्रमातील बोलत होती आमदार नारायण आबा पाटील यांच्या प्रयत्नातून रावगाव तालुका करमाळा येथे १३/११ के व्ही ए, क्षमतेच्या उपजीव केंद्राची उभारणी पूर्ण होऊन आज प्रत्यक्षात यातून किती पंपासाठी वीज पुरवठा सुरू झाला आहे. यावेळी नारायण आबा पाटील यांच्या हस्ते कर दाबून विद्युत प्रवाह सुरू करण्यात आला यावेळी आयोजित कार्यक्रमात व्यासपीठावर सावध गटाचे नेते सुनील सावंत आदिनाथ सहकारी साखर कारखाना संचालक डॉक्टर हरिदास केवारी संचालक राहुल सावंत माजी सभापती अतुल पाटील जिल्हा परिषदेचे भाऊ गोडसे संचालक राजाभाऊ कदम संचालक रविकिरण फुके पंचायत समिती सदस्य स्वप्निल काळे उपअभियंता कलावती उभा अभियंता भोगीर सरपंच संदीप शेळके गोवर्धन करगळ विलास बर्डे सुभाष पवार विलास मुळे, हबीब मुलानी प्रशांत बर्डे दादा पवार शहाजी शिंदे संतोष वर्पे रामदास बाबर भारत इंगळे विनोद सोळंकार मच्छिंद्र जायभाय गौतम वारे नानासाहेब जाधव आणि उपस्थित होते यावेळी बोलताना आमदार नारायण पाटील म्हणाले की माजी आमदार पदाच्या मागील टर्म मध्ये रावगाव सब स्टेशन साठी आपण प्रस्ताव दाखल केला होता २०१८ मध्ये या कामास आपण मंजुरी मिळवून दिली ही जागा खरेदी पर्यंत सर्व प्रवेश पत्र लिहिले आता केवळ उभारणी बाकी असताना आमदार पदाचा कालावधी संपला व सण त्यानंतर सन २०१९ ते २०२४ मध्ये हे काम हाणून पाण्याची पाप तत्कालीन आमदार संजय मामा शिंदे यांनी केले आज परत मी आमदार पदावर असताना फिरसे एकदा पाठपुरावा करून ते काम पूर्ण करून दाखवली आज यातून वीजपुरवठा सुरळीत चालू झाला आहे भविष्यात या भागातील जमीन मुलीचा खाली आणण्यासाठी आपण नियोजित रेटेवाडी उपसा सिंचन योजनेचे काम स्टडीज नेण्यासाठी सर्व राजकीय ताकद पणाला लावणार असून शेतकऱ्यांच्या पडबळीची गरज आपल्या असल्याचे आमदार नारायण आबा पाटील यांनी बोलून दाखवले प्रस्ताविक आमदार नारायणराव पाटील गटाची प्रवृत्ती सुनील तळेकर यांनी केले तर यावेळी राजाभाऊ कदम व सुनील सावंत यांनी विचार मांडणी सूत्रसंचालन सूर्यकांत पाटील यांनी केले तर विलास बर्डे यांनी आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# जिल्ह्यात मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी : पालकमंत्री जयकुमार गोरे

## मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेचा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी घेतला आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : मुख्यमंत्री बळीरराजा शेत/ पाणंद रस्ते योजना ही शासनाची एक महत्त्वाची योजना असून आत्तापर्यंतच्या शेत रस्ते योजनेतील सर्वोत्तम योजना आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व लोकप्रतिनिधी व अधिकारी यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपला जिल्हा या योजनेत राज्यात अग्रेसर राहील यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेचा आढावा पालकमंत्री श्री. गोरे यांनी घेतला. त्याप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार समाधान आवताडे, आमदार उत्तम जानकर, आमदार नारायण पाटील, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार अभिजीत पाटील, जिल्हाधिकारी कार्तिकियेन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी रोहयो अंजली मरोड यांच्या सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे म्हणाले की, मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते योजने अंतर्गत पहिल्या टप्प्यात वाद नसलेल्या रस्त्यांचे सीमांकन करून घ्यावे. या रस्त्यांची कामे त्वरित सुरू करण्याच्या दृष्टीने कार्यवाही पूर्ण करावी. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात वाद असलेल्या रस्त्या अंतर्गत वाद मिटणारे तसेच वाद न मिटणारे रस्त्यांचे वर्गीकरण पूर्ण करावे. या योजनेअंतर्गत तालुकास्तरीय समितीचे अध्यक्ष संबंधित तालुक्याचे आमदार यांनी तालुकास्तरीय अधिकारी यांच्याशी चांगला समन्वय ठेवावा व या योजनेच्या कामाला अधिक गती द्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

या योजनेअंतर्गत एक किलोमीटरच्या रस्त्यासाठी १५ लाख पर्यंतचा खर्च प्रस्तावित करण्यात आलेला आहे. जिल्ह्यात या योजनेच्या कामांना निधीची कमतरता नाही त्यामुळे सर्वांनी वाद नसलेल्या रस्त्याच्या कामांना प्राधान्य देऊन तात्काळ कामे सुरू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत असेही सूचना पालकमंत्री श्री. गोरे यांनी दिल्या. त्याप्रमाणेच काही तांत्रिक अडचणी आल्यास त्या सोडवल्या जातील असेच सांगितले.

महसूल व वन विभागामार्फत ही योजना १४ डिसेंबर २०२५ रोजी सुरू करण्यात आली असून शेतकऱ्यांना शेतमाल वाहतुकीसाठी मजबूत व




सुलभ रस्ते उपलब्ध करून देणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेत शेतररस्ते व पाणंद रस्त्यांचा समावेश असून एका किमी साठी कमाल १५ लाख रुपये खर्च करता येणार आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी चर खोदून मुरुम टाकून दबाई केली जाणार असून आवश्यक ठिकाणी सिमेंट पाईप बसवले जातील. योजनेसाठी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व विधानसभा क्षेत्रस्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. तसेच जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष पालकमंत्री असून जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक आदी अधिकारी सदस्य आहेत, अशी माहिती उपजिल्हाधिकारी रोहयो अंजली मरोड यांनी दिली.

जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षक श्री. घोडके यांनी जिल्ह्यातील ४९११ शेत/पानंद रस्त्याची यादी प्राप्त झालेली असून त्यातील ३७२ रस्त्यांचे सीमांकन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. उर्वरित रस्त्यांच्या सीमाकानाची कार्यवाही वेगाने सुरू असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

---

## खासदार प्रणिती शिंदे यांच्या सातत्याने पूर्ण पाठपुराव्यामुळे भीमा नदीकाठील वीजपुरवठा पूर्ववत सुरू करण्याचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर शहर व इतर पाणीपुरवठा योजना व शेतीसाठी उजनी धरणातून पाणी सोडण्यात आले होते परंतु त्या दरम्यान जिल्ह्यातील मंगळवेढा पंढरपूर मोहोळ व दक्षिण सोलापूर तालुक्यातील नदीकाठच्या शेतकऱ्यांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता व नंतर हा वीजपुरवठा तीन तासावर करण्यात आला परंतु ह्यामुळे नदीला पाणी असूनही इंडिकाच्या शेतकऱ्यांच्या शेतीतील उभी पिके धोक्यात आली होती याची तात्काळ दखल घेऊन खासदार प्रणिती शिंदे यांनी जिल्हाधिकारी श्री कीर्ती केयन साहेब यांच्याकडे वीजपुरवठा पूर्ववत करण्याची मागणी केली त्याबद्दल सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे आज रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वीजपुरवठा पूर्ववत करण्यासंदर्भात महावितरण कंपनीला आदेश देण्यात आले आहे.

---

## निफाड पोलीस ठाणेकडुन दुचाकीस्वाराना हेल्मेट वापरण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : सध्या निफाड पोलीस स्टेशन हद्दीत पिंपळस ते येवला संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाचे काम प्रगतीपथावर असून रस्त्याच्या एका बाजूचे काम पूर्णत्वाकडे गेले असले तरी दुसरी बाजू मोठ्या प्रमाणावर खोदकाम अवस्थेत असल्याने संपूर्ण वाहतूक एकाच मार्गावरून सुरू आहे.

यामुळे दुचाकी व चारचाकी वाहनचालकांमध्ये सिंगल रस्त्यांवर ओव्हरटेक करण्याची घाईमुळे गंभीर अपघातांचे प्रमाण वाढले आहे. अनेक अपघातांमध्ये जीवितहानी देखील होत आहे.

### नियमभंग करणाऱ्यावर कठोर कारवाई होणार

निफाड पोलीस ठाणेतर्फे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की

- दुचाकी चालवतांना अनिवार्यपणे हेल्मेट परिधान करावे,
- चारचाकी वाहन चालवतांना सीट बेल्टचा वापर करावा,
- वाहन चालवताना वेगावर नियंत्रण ठेवावे,
- ओव्हरटेक करताना संयम व वाहतूक नियमांचे पालन करावे,

सर्व नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करून सुरक्षित वाहतुकीस हातभार

**आपल्या स्वतःच्या व आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी वाहतूक नियमांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे.**

**यापुढे निफाड पोलीस स्टेशनकडून विना हेल्मेट वाहन चालविणाऱ्यांविरुद्ध विशेष दंडात्मक मोहीम राबविण्यात येणार असून नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.**

**– गणेश गुरव, पोलीस निरीक्षक निफाड**



लावावा, असे आवाहन निफाड पोलीस ठाण्याचे वतीने करण्यात आले आहे.

---

## घोटी जनता विद्यालयाने राखली कायम उज्वल यशाची परंपरा

**विद्यालयाचा दहावीचा निकाल ७६. २८ टक्के**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**






सिन्नर/प्रतिनिधी : इगतपुरी तालुक्यातील घोटी येथील जनता विद्यालय व जुनिअर कॉलेज या विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ७६ .२८ टक्के इतका लागला असून विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा या वर्षीही कायम राखल्याने सर्वत्र समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

मार्च -२०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत परीक्षा मध्ये विद्यालयातील समृद्धी सचिन चव्हाण (९१. ६०) प्रथम, समीक्षा मल्हारी पंडित (८८.४०) द्वितीय , गणेश एकनाथ माळी (८७. २०) तृतीय, अदिती श्रीनिवास पोतदार (८६. ४०) चतुर्थ, , मानव विनोद चंद्रमोरे (८५ ) याने पाचवा क्रमांक मिळवत यश संपादन केले.


विद्यालयातील २९१ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते .त्यापैकी २२२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.२० विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य तर ५१ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळविली.८४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचे मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस अँडव्होकेट नितीन ठाकरे, तालुका संचालक अँडव्होकेट संदीप भाऊ गुळवे , संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ.भास्करराव ढोके, शालेय समितीचे अध्यक्ष मनोज भाऊ जाधव ,उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष राजेंद्र आप्पा जाधव , प्राचार्य नितीन भामरे ,उपमुख्याध्यापक उल्हास पवार,पर्यवेक्षक हिरामण चौधरी, मुख्य लिपिक भाऊसाहेब रणशेवरे, जेष्ठ शिक्षक चारूलता तागडे, सोमनाथ गिरी आदींसह शालेय समितीचे सदस्य, पालक शिक्षक संघ सदस्य, शिक्षक, शिक्षकेतर सेवक यांनी अभिनंदन केले आहे.

---

## आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या वडिलांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सांगोला : सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांचे वडील तथा विक्रमवीर आमदार स्वर्गीय गणपतराव देशमुख यांचे ज्येष्ठ सुपुत्र पोपट गणपतराव देशमुख (वय ६९) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी (ता. ११) निधन झाले. गेले काही दिवस ते आजारी होते.

पोपट देशमुख हे मूळचे मोहोळ तालुक्यातील पेनूर येथील रहिवासी होते. त्यांचे वडील स्वर्गीय गणपतराव देशमुख हे राज्याच्या राजकारणात दीर्घकाळ सक्रिय राहून विक्रमी अकरा वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. मात्र, इतक्या मोठ्या राजकीय वारशाची पार्श्वभूमी असतानाही पोपट देशमुख यांनी कधीही सक्रिय राजकारणात सहभाग नोंदवला नाही. ते साधेपणाने आपल्या मूळ गावी राहून सामाजिक व कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडत होते.

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या राजकीय प्रवासात व त्यांना आमदार बनविण्यामागे पोपट देशमुख यांचे मोलाचे योगदान असल्याचे मानले जाते. शांत, संयमी व मनमिळावू स्वभावामुळे त्यांना परिसरात विशेष मान होता.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्यावर मंगळवारी (ता. १२) सकाळी ९ वाजता पेनूर (ता. मोहोळ) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

---

**पाणीटंचाई कृती आराखडा आढावा बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे निर्देश**

# प्रशासनाकडे टँकर मागणीचा प्रस्ताव आल्यानंतर ४८ तासात मंजुरी प्रदान करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जिल्ह्यातील कोणत्याही गावातून संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्याकडे टँकर मागणी चा प्रस्ताव आल्यानंतर त्यांनी २४ तासात प्रांत अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठवा व त्यानंतरच्या २४ तासात प्रशासनाने या प्रस्तावाला मान्यता प्रदान करावी. म्हणजे ४८ तासात टँकर मागणी प्रस्तावावर प्रशासनाने निर्णय घेऊन मंजुरी प्रदान करावी, असे निर्देश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित पाणीटंचाई कृती आराखडा आढावा बैठकीत पालकमंत्री गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, राज्यसभा खासदार ज्योती वाघमारे, आमदार सुभाष देशमुख, आमदार समाधान आवताडे, आमदार उत्तम जानकर, आमदार नारायण पाटील, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार अभिजीत पाटील, जिल्हाधिकारी कार्तिकियेन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निराळी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उजनी धरणाचे अधीक्षक अभियंता सकृत खांडेकर, वीज वितरण कंपनीचे अध्यक्ष अभियंता सुनील माने यांच्या सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.




सद्यस्थितीत जिल्ह्यात अक्कलकोट तालुक्यातील एक व माळशिरस तालुक्यातील चार गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे व पुढच्या काही कालावधीत तो ४० टँकर पर्यंत जाईल. तरी टंचाई कृती आराखड्यातील २४ तातपुरत्या पाणीपुरवठा योजनाना मान्यता देण्यात येत असून कामे त्वरित सुरुवात करावी व जिल्ह्यात टंचाईची परिस्थिती उद्भवणार नाही यासाठी काटेकोरपणे नियोजन ठेवावे असे निर्देश श्री. गोरे यांनी यावेळी दिले.

त्याप्रमाणेच उजनी धरणातून ऑगस्ट २०२६ पर्यंत पिण्याच्या पाणी चे नियोजन करण्यात आलेले आहे. उजनी धरणातील पाणीसाठा मायनस मध्ये गेला असल्याने नवीन आवर्तने यातून देता येणार नाहीत. हे सर्व पाणी पिण्यासाठी आरक्षित असून सद्यस्थितीत पाणी वाटप मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मंगळवेढा येथील भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना व अन्य पाणीपुरवठा योजनांसाठी तसेच एमजीपीच्या योजनांसाठी स्वतंत्र बैठक प्रशासनाने आयोजित करण्याबाबत पालकमंत्री श्री. गोरे यांनी सुचित केले. त्याप्रमाणेच पाणीपुरवठा योजनांना वीज वितरण कंपनीने वीज पुरवठा सुरळीत ठेवावा थकबाकी अभावी वीज पुरवठा खंडित होता कामा नये याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही यावेळी त्यांनी दिले.

यावेळी अधीक्षक अभियंता श्री खांडेकर यांनी उजनी धरणातील पाणीसाठ्याची माहिती दिली. धरणातील पाणीसाठा वृत्त असून सद्यस्थितीत ५९ टीएमसी पाणीसाठा असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित सर्व लोकप्रतिनिधी यांनी त्यांच्या मतदारसंघातील प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तसेच अन्य पाणीपुरवठा योजना वीज पुरवठा सुरळीत सुरू ठेवण्याची मागणी करण्यात आली तसेच गावातून टँकरची मागणी झाल्यास पाहणी करून प्रशासकीय यंत्रणेने त्वरित टँकर सुरू करावा, अशीही मागणी करण्यात आली.

# श्रीराम प्रतिष्ठानच्या सर्व धर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यात २५ जोडपे विवाह बंधनात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : करमाळा शहरात श्रीराम प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सर्व धर्मीय सामुदायिक विवाह सोहळा यंदाही अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणात मोठ्या थाटामाटात संपन्न झाला या भव्यविवाह सोहळ्यात तब्बल २५ झोडके विवाह बंधनात अडकले असून संपूर्ण परिसर आनंद भाई वातावरण आणि भारावून गेला होता.

सालाबाद प्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या या विवाह सोहळ्याने करमाळा तालुक्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेत एक वेगळे स्थान निर्माण केले आहे सर्व दरम्यान समाजाला एकत्र आणत सामाजिक जन-तेचा संदेश देणारा हा सोहळा हजारो नागरिकांच्या उपस्थितीत दिमाखात पार पडला.

या भव्य विवाह सोहळ्यास महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ग्राम विकास व पंचायत राज्यमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, माढा लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार रणजीत सिंह नाईक निंबाळकर अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार सचिन कल्याण शेट्टी, बार्शीचे माजी आमदार राजाभाऊ राऊत आमदार नारायण आबा पाटील माजी आमदार संजय मामा शिंदे जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीत पवार भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण शिवाजीभाऊ पवार अविनाश महागावकर चेतन शेळकेदार रश्मी दिदी बागल यांच्यासह विविध क्षेत्रा-तील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी ९० वरांना शुभारशीर्वाद देत त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी श्रीराम प्रतिष्ठानच्या सामाजिक कार्याची विशेष कौतुक करत अशा उपक्रमामुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडत असल्याचे सांगितले व पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सामाजिक बांधिलकी जपत सर्वसामान्य कुटुंबांना दिलासा देणारा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे नमूद करत गणेश चिवटे यांचे कौतुक केले.

यावेळी माजी खासदार रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांनी प्रत्येक वर्षी प्रमाणे याही वर्षी विवाह सोहळ्यास उप-स्थित राहत नवतांपत्यांना आशीर्वाद दिले व त्यांनी श्रीराम प्रतिष्ठानच्या माध्यमातून होत असलेल्या समाज उपयोगी कार्याचे कौतुक करत भविष्यातही अशा उपक्रमांना आपला कायम पाठेवर राहील असेही सांगितले.

विवाह सोहळा दरम्यान संपूर्ण परिसरात आनंद उत्सव आणि आपुलकीचे वातावरण पाहायला मिळाले यावेळी तालुक्यातील नागरिकांनी वऱ्हाडी मंडळी आणि विविध समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते गरजू कुटुंबांच्या आयुष्यात आनंद निर्माण करत समाजातील ऐक्य अधिक दूर करणारा श्रीराम प्रतिष्ठांचा हा सर्व धर्मीय सामुदायिक विवाह सोहळा करमाळा तालुक्यात सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उद-ाहरण ठरला आहे.

## गौडगावच्या अन्नछत्र मंडळात हजारो भक्त महाप्रसादाने तृप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विश्वनाथ चव्हाण/ अक्कलकोट : समर्थ रामदास स्वामी स्थापित हेमाडपंथी श्री जागृत दक्षिणमुखी मारुती मंदिर' हे आज लाखो भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे.अक्कलकोट तालुक्यातील गौडगाव (बु.) येथील या मंदिराची ख्याती केवळ आध्यात्मिक कारणांमुळेच नव्हे, तर येथील अविरत सुरू असलेल्या 'अन्नछत्र' उपक्रमामुळे सर्वदूर पसरली आहे.मंदिरात दर्शनासाठी येणारा कोणताही भक्त महाप्रसाद घेतल्याशिवाय इथून मार्गस्थ होत नाही, ही परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने जपली जात आहे.



गौडगावच्या या जागृत मारुतीरायाच्या दर्शनासाठी प्रामुख्याने शनिवार आणि मंगळवारी भाविकांची मोठी वर्दळ असते.भाविकांच्या जुन्या श्रद्धेनुसार,सलग ११ शनिवार व मंगळवार येथे येऊन मारुतीरायाचे दर्शन घेतल्यास मनातील सर्व इच्छा पूर्ण होतात. याच श्रद्धेपोटी महाराष्ट्र,कर्नाटक आणि आंध्र प्रदेश या राज्यांतून हजारो भाविक दर्शनासाठी येतात.

शनिवारी अक्कलकोट स्टेशनपासून गौडगावपर्यंत दोन किलोमीटरचे अंतर पायी पार

### दक्षिणमुखी मारुती मंदिराच्या कीर्तीत मोठी भर

करणाऱ्या पदयात्रींची संख्या लक्षणीय आहे.अन्नछत्र मंडळाचे सेवाकार्य दूरवरून येणारा कोणताही भक्त उपाशी राहू नये, या उद-ात्त हेतूने मंदिर समितीने 'अन्नछत्र मंडळाची' स्थापना केली आहे.येथे येणाऱ्या प्रत्येक भाविकाला मंदिर समितीच्या वतीने पोटभर आणि स्वादिष्ट महाप्रसाद दिला जातो.

ज्या भाविकांच्या मनोकामना पूर्ण होतात, ते कृतज्ञता म्हणून स्वतःहून महाप्रसादाचे आयोजन करतात.अनेक दानशूर भक्त अन्नदानाच्या स्वरूपात या कार्यात आपला खारीचा वाटा उचलत आहेत.

कडाक्याची थंडी असो, उन्हाळ्याची दाहकता असो किंवा पावसाळ्याचे दिवस; तिन्ही ऋतूंमध्ये भाविकांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. वाढत्या गर्दीचा विचार करून मंदिर समितीने पिण्याचे पाणी, दर्शनाची रांग आणि महाप्रसादासाठी सूक्ष्म नियोजन केले आहे.

अन्नछत्र मंडळाची ही कीर्ती आणि सुव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी मंदिराचे अध्यक्ष श्रीकांत खानापुरे, सचिव सिद्राम वाघमोडे, प्रकाश मेंथे आणि त्यांचे सर्व सहकारी विश्वस्त अह-ोरात्र परिश्रम घेत आहेत.त्यांच्या अचूक नियोजनामुळेच हज-ारो भक्त शांततेत दर्शन घेऊन समाधान व्यक्त करत आहेत. साक्षात नवसाला पावणारा देव अशी ओळख निर्माण झाल्यामुळे गौडगावच्या दक्षिणमुखी मारुती मंदिराकडे येणारा भक्तांचा ओघ दिवसेंदिवस वाढत असून, येथील 'अन्नदान' उपक्रम मानवतेची सेवा करणारा एक दीपस्तंभ ठरत आहे.

## माळशिरस विधानसभेच्या इतिहासात पहिल्यांदा तत्कालीन माजी आमदार राम सातपुते यांची जनता दरबाराला सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : माळशिरस विधानसभेचे लोकप्रिय दमदार तत्कालीन माजी आमदार राम सातपुते यांनी माळशिरस विधानसभेच्या इतिहासात पहिल्यादा जनता दरबार सुरू करून सर्वसामान्य गोरगरीब जनतेला हक्काचे व्यासपीठ निर्माण केलेले होते. आमदार व जनता यामधील दरी कमी करून सर्वसामान्य गरजू लोकांसाठी जनता दरबाराचा उपयोग होऊन अनेकांनी सार्वजनिक व्यक्तिगत प्रश्न मार्गी लावलेले आहेत दहिगाव जिल्हा परिषद गटाच्या सदस्य तथा समाज कल्याण सभापती सौ संस्कृती ताई राम सातपुते यांनी दहेगाव येथील हनुमान मंदिर येथे बुधवार दिनांक १३/०५/२०२६ रोजी सकाळी आठ वाजता जनता दरबाराची आयोजन केलेले आहे पतीच्या पावलावर पाऊल वाटेवर पत्नीचा दैद्यमान वाटचाल सुरू असल्याचे जनता दरबाराचे दहिगाव जिल्हा परिषद सदस्य गटासह माळशिरस तालुक्यातील मध्ये निर्णयाचे स्वागत केले जात आहे.

तत्कालीन दमदार आमदार राम सातपुते यांनी आयोजित केलेल्या जनता दरबाराचे महत्त्व सर्वसामान्य व गरजू लोकांना माहिती झालेले आहे व सार्वजनिक व्यक्तिगत प्रश्नांची सोडवणूक जागच्या जागीच होत असते त्यामुळे जनता दरबारात अनेक लोक आपले प्रश्न मार्गी लावून घेत असतात दहिगाव जिल्हा परिषद गटामध्ये सौ संस्कृती ताई सातपुते यांनी प्रचाराच्या वेळी गटातील वाड्या वस्त्या व गाव भेटीमध्ये लोकांच्या अडीअडचणी जाणून घेतलेल्या होत्या जनतेसाठी जागृत असणाऱ्या व लोकांच्या अडचणी सोडवण्याकरिता सदर-चे अडचणीचे निवारण करून व्यक्तिगत जनतेच्या अडचणी मांडण्यासाठी लोकांना हक्काचे व्यासपीठ असावे याकरिता

### जिल्हा परिषदेच्या राजकीय इतिहासात पहिल्यांदाच जनता दरबाराचे आयोजन

जनता दरबाराची आयोजन केलेले आहे जिल्हा परिषदेच्या राजकीय इतिहासात पहिल्यांदाच जनता दरबाराचे आयोजन केलेले आहे जनता दरबारी सर्व स्तरातून स्वागत केली जात आहे.



## गटारीचे पाणी रस्त्यावर,अन् यात्रा उंबरठ्यावर! बबलादच्या ग्रामसेवकांविरुद्ध संतापाची लाट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : तालुक्यातील बबलाद येथील ग्रामदैवत श्री चौडम्मा देवीची यात्रा दिनांक २३ मे २०२६ पासून मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. मात्र, यात्रेच्या तोंडावर गावात स्वच्छतेचा पूर्णपणे बोजवारा उडाला असून, ग्राम प्रशासनाच्या उदासीनतेमुळे भाविक आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

यात्रेनिमित्त गावात स्वच्छता आणि नियोजनाची आवश्यकता असताना,सध्या गावातील अंतर्गत गटारी तुंबलेल्या अवस्थेत आ-हेत.हनुमान मंदिर,बसवेश्वर कट्टा आणि जिल्हा परिषद शाळा या मुख्य परिसरात गटारीचे सांडपाणी रस्त्यावरून वाहत आहे.याच मार्गावरून पालखी आणि भाविकांची ये-जा असते, त्यामुळे आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

> **परमानंद तांड्यावरून घरपट्टी आणि पाणीपट्टीची शंभर टक्के वसुली केली जाते, मात्र या तांड्याच्या विकासावर एक रुपयाही खर्च केला जात नाही. ग्रामपंचायत सदस्य असूनही आमचे म्हणणे ऐकून घेतले जात नाही. महिला अधिकारी म्हणून आम्ही त्यांचा सन्मान करतो, परंतु त्यांच्याकडून विकासकामांबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही. गावातील जत्रेचे कोणतेही नियोजन अद्याप केलेले नाही.**
>
> **महादेव चव्हाण ग्रा स .परमानंद तांडा(बबलाद)**

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गावातील जलजीवन योजनेचे काम बंद अवस्थेत असल्याने शुद्ध पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

यात्रेसाठी परगावाहून येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असते, अशा वेळी प्रशासनाने पाणीपुरवठा सुरळीत करणे गरजेचे होते. मात्र, वारंवार सूचना देऊनही ग्रामसेवक याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

> **ग्रामसेवकांच्या मनमानी कारभारामुळे बबलादमध्ये सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यास प्रशासन अपयशी ठरले आहे. मुख्य रस्ते आणि मंदिराच्या परिसरात गटारीचे पाणी साचल्याने यात्रेनिमित्त बाहेरून येणाऱ्या पाहुण्यांचे आणि भाविकांचे हाल होणार आहेत. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन यात्रेपूर्वी स्वच्छता करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.**

ग्रामपंचायत स्तरावर घरपट्टी आणि पाणीपट्टीची नियमित वसुली केली जाते,परंतु विकासकामांच्या बाबतीत मात्र 'झिरो' प्रगती असल्याचे चित्र आहे. गटविकास अधिकाऱ्यांनी तोंडी समज देऊनही ग्रामसेवक आपल्या कामात सुधारणा करत नाहीत, तसेच मासिक बैठकांचेही आयोजन केले जात नाही, अशी तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.

### पंढरपूर तालुका पोलिसांची जुगार अड्ड्यावर मोठी कारवाई

## ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केलेला असून त्यामध्ये आठ आरोपींच्या विरोधात मुंबईचा जुगार अधिनियम कलम १२ अ प्रमाणे एकूण आठ आरोपींना घेतलं ताब्यात




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक १० मे २०२६ रोजी पंढरपूर तालुका पोलिसांनी आगामी यात्रा सण उत्सवच्या अनुषंगाने पंढरपूर तालुका पो-लीस ठाणे हद्दीतील मौजे सरकोली या ठिकाणी माननीय साहेब पोलीस अध-ीक्षक श्री प्रशांत डगळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलिसांनी अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या आरोपींना रेड करून एकूण ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल त्यामध्ये पाच मोबाईल फोन व रोख रक्कम अशा या जुगाराची साहित्य असा एकूण ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी सरकोली गावात रेड करून जप्त केलेला आहे.

सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक साहेब श्री अतुल कुलकर्णी ,माननीय अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम यावलकर साहेब ,माननीय सहाय्यक पोलीस अध-ीक्षक श्री प्रशांत डगळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पो-लीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर, सहाय्यक पो-लीस निरीक्षक शहाजी गोसावी, पोलीस उपनिरीक्षक विक्रम वडणे, करी पोलीस हवालदार, पोलीस हव-ालदार सुजित उबाळे, सुहास देशमुख दीपक भोसले पोलीस कॉन्स्टेबल संजय गुटाळ यांच्या पटकन केले आहे.

## पालखेड विद्यालयाचा इयत्ता १० वीचा ९४.६२% उत्कृष्ट निकाल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी

महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे पालखेड येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयाचा इयत्ता १० वीचा निकाल ९४.६२% लागलाअसून विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा यावर्षीही कायम राखली आहे. विद्यालयात परीक्षेस एकूण प्रविष्ठ विद्यार्थी९६, गैरहजर०३ तर उत्तीर्ण विद्यार्थी ८८ झाले असून अनुक्रमे प्रथम पाच गुणवंत विद्यार्थ्यांचे निकाल पुढीलप्रमाणे आहेत. प्रथम अक्षदा जगताप ९१.६०%,ि द्वतीय विना थेटे ८८.६०%, तृतीय नयना आहेर ८८.२०%,चतुर्थ साई शेळके ८७.४०%,पाचवा सिद्धेश्वर पवार ८६.८०% असे आहेत. तसेच विशेष प्राविण्य श्रेणीत २५ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत २९,द्वितीय श्रेणीत २०, उत्तीर्ण श्रेणीत १४ विद्यार्थी आहेत. सदर सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव जोंधळे, उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे, कार्यकारी संचालक प्रा.दीपक जोंधळे, कार्याध्यक्ष तथा सचिव दत्तात्रेय जोंधळे, स्थानिक स्कूल कमिटीचे उपाध्यक्ष अशोक आहेर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश थेटे, शिक्षक-पालक संघाचे अध्यक्ष विजय आहेर, उपाध्यक्ष रवींद्र कोकाटे, मुख्याध्यापक अशोक शेळके व सर्व कमिटी सदस्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.